ePaper

## 'मला नियम शिकवू नका!'; मल्लिकार्जुन खर्गे किरेन रिजिजू यांच्यावर भडकले



वर्ष - 9 | UDYAM-MH-26-0158827

# महाईन्यूज™

WWW.MAHAENEWS.COM | शुक्रवार, दि. 07 ऑगस्ट 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!




पान 3 वरुन...

पिंपरी-चिंचवडच्या वाहनधारकांना मोठा दिलासा!

### बलात्कार प्रकरणात २०२१चा निर्णय पलटला; गोवा खंडपीठाने सुनावली कठोर शिक्षा

# तरुण तेजपाल दोषी; १० वर्षांची शिक्षा



महाईन्यूज | पणजी

**तहलकाचे माजी संपादक तरुण तेजपाल यांना २०१३ मधील बलात्कार प्रकरणात मुंबई उच्च न्यायालयाच्या गोवा खंडपीठाने १० वर्षांच्या सश्रम कारावासाची शिक्षा सुनावली आहे. न्यायालयाने यापूर्वी कनिष्ठ न्यायालयाने दिलेला निर्दोष मुक्ततेचा निर्णय रद्द करून तेजपाल यांना दोषी ठरवले.**

गोव्यातील एका पंचतारांकित हॉटेलमध्ये २०१३ मध्ये 'थिंकफेस्ट' कार्यक्रमादरम्यान हा प्रकार घडला होता. तेजपाल यांनी आपल्यासोबत काम करणाऱ्या एका कनिष्ठ महिला सहकाऱ्यावर हॉटेलच्या लिफ्टमध्ये लैंगिक अत्याचार केल्याचा आरोप करण्यात आला होता. या प्रकरणी त्यांना ३० नोव्हेंबर २०१३ रोजी अटक करण्यात आली होती. त्यानंतर त्यांना जामीन मिळाला होता.

### 'मीच पीडित आहे' असा तेजपाल यांचा दावा

शिक्षेपूर्वी न्यायालयात तेजपाल यांनी आपण ६२ वर्षांचे असून स्वतःला पीडित मानत असल्याचे सांगत शिक्षेबाबत सौम्य भूमिका घेण्याची विनंती केली. तसेच आपण दोन मुलींचे वडील असल्याचे सांगत दयेची मागणी केली. या निर्णयाविरोधात पुढील कायदेशीर पर्यायांचा अवलंब करण्याची शक्यताही त्यांनी व्यक्त केली.

दरम्यान, गोवा सरकारतर्फे बाजू मांडताना सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी कठोर शिक्षेची मागणी केली. "नाही म्हणजे नाही" हा स्पष्ट संदेश जाणे आवश्यक असल्याचा युक्तिवाद सरकारच्या वतीने करण्यात आला.







### २०२१ मधील निर्दोष मुक्तता रद्द

या प्रकरणात गोव्यातील सत्र न्यायालयाने २०२१ मध्ये पुराव्यांअभावी तेजपाल यांची निर्दोष मुक्तता केली होती. या निर्णयाला गोवा सरकारने उच्च न्यायालयात आव्हान दिले होते. सुनावणीनंतर गोवा खंडपीठाने कनिष्ठ न्यायालयाचा निर्णय बाजूला ठेवत तेजपाल यांना बलात्काराच्या आरोपात दोषी ठरवले आणि आता १० वर्षांच्या सश्रम कारावासाची शिक्षा सुनावली आहे.

### बलात्काराचं प्रकरण नेमकं काय?

२०१३मध्ये गोव्यातील पंचतारांकित हॉटेलमध्ये 'थिंकफेस्ट' कार्यक्रमादरम्यान तरुण तेजपाल यांच्यावर महिला सहकाऱ्याच्या लैंगिक शोषणाचा आरोप झाला. या प्रकरणी ३० नोव्हेंबर २०१३ रोजी त्यांना अटक झाली होती.



### १३ वर्षांनंतर प्रकरणाला निर्णायक वळण



२०१३ मध्ये दाखल झालेल्या या प्रकरणाला तब्बल १३ वर्षांनंतर महत्त्वपूर्ण वळण मिळाले आहे. २०२१ मधील निर्दोष मुक्ततेनंतर उच्च न्यायालयात झालेल्या अपीलमध्ये आता दोषसिद्धी कायम करण्यात आली असून तेजपाल यांना १० वर्षांची शिक्षा सुनावण्यात आली आहे. त्यांना शिक्षा भोगण्यासाठी दोन आठवड्यांत शरण येण्याची मुदत देण्यात आली आहे.

# 'ससून'ला मिळणार १५ एकर जागा?

## मल्टिस्पेशालिटी रुग्णालय उभारणीसाठी भूमी अभिलेख विभागाला मोजणीचे आदेश

**महाईन्यूज । पुणे**

**ससून रुग्णालायचा विस्तार करून मल्टिस्पेशालिटी रुग्णालयाच्या उभारणीसाठी १५ एकर जागा द्यावी, असा प्रस्ताव रुग्णालयाने जिल्हा प्रशासनाला दिला आहे. त्यानुसार जागेची चाचपणी करण्याची सूचना जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी भूमी आणि अभिलेख विभागाला दिली आहे. त्यानुसार येरवडा येथील मनोरुग्णालयाच्या १३८ एकर जागेपैकी १५ एकर जागा ससून रुग्णालयाच्या विस्तारासाठी देण्यात येण्याची शक्यता आहे.**




राज्याच्या वैद्यकीय शिक्षण विभागाने नवे सुपर मल्टिस्पेशालिटी रुग्णालय उभारण्याचा निर्णय घेतला आहे. या बाबत वैद्यकीय शिक्षण विभागाने महसूल विभागाकडे जागा मागणीचा प्रस्ताव दिला होता. त्या प्रस्तावाच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांच्या अध्यक्षतेखाली बुधवारी बैठक झाली.

ससून रुग्णालय आणि बी. जे. मेडिकल कॉलेजचे अधिष्ठाता डॉ. एकनाथ पवार, येरवड्यातील मनोरुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक, तहसीलदार आणि महसूल तसेच भूमी अभिलेख विभागाचे अधिकारी या बैठकीला उपस्थित होते. ससून रुग्णालयास मल्टिस्पेशालिटी रुग्णालय उभारण्याचा प्रस्ताव आहे. सुमारे एक हजार खाटांचे हे रुग्णालय असेल. त्या रुग्णालयात कर्करोगाचे स्वतंत्र रुग्णालय असून, रुग्णालयासाठी सुमारे १५ एकर जागेचा शोध घेण्याचा जिल्हाधिकाऱ्यांनी भूमी अभिलेख आणि महसूल विभागाला आदेश दिला आहे.

येरवडा येथील मनोरुग्णालयाच्या मालकीची सुमारे १३८ एकर जागा उपलब्ध आहे. त्या जागेपैकी मनोरुग्णालय, वसतिगृह वगळता उर्वरित मोठ्या प्रमाणात जागा उपलब्ध आहे. गेल्या अनेक वर्षापासून या रुग्णालयाची सरकारी गायरान जागा तशीच पडून आहे. तसेच, या जागेवर स्थानिकांकडून अतिक्रमण होण्याची शक्यता आहे. या जागेची मोजणी करून १३८ एकर जागा ताब्यात आहे, का याची खातरजमा केली जाणार आहे. त्यानंतर किती जागेवर अतिक्रमण आहे ते तपासले जाईल. त्यानुसार उर्वरित जागेपैकी १५ एकर जागा ससून रुग्णालयास मल्टिस्पेशालिटी रुग्णालयास उपलब्ध करण्याचा जिल्हा प्रशासनाने विचार सुरू केला आहे.

या संदर्भात भूमी अभिलेख विभागाला या जागेची मोजणी करून त्याचा अहवाल येत्या २० दिवसांत देण्याचे महसूल प्रशासनाने सूचना केली आहे. मनोरुग्णालयाची ही जागा आरोग्य विभागाच्या अखत्यारित येत आहे. त्यामुळे आरोग्य विभागाच्या 'ना हरकत' प्रमाणपत्रानंतर जागा ताब्यात मिळणार असल्याचे जिल्हा प्रशासनाकडून सांगण्यात आले. दरम्यान, ससून रुग्णालयाने मल्टिस्पेशालिटी रुग्णालय उभारण्यासाठी १५ एकर जागेची मागणी प्रशानसाकडे केली आहे. त्यानुसार जागा शोधण्याची सूचना देण्यात आल्याची माहिती जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी दिली.

# सायलेन्सरचा 'आवाज' काढणाऱ्या २७४ दुचाकीस्वारांवर कारवाई!

**महाईन्यूज । पुणे**

**रात्री-अपरात्री फटाक्यासारखा आवाज काढणारे बुलेटचालक, कर्णकर्कश हॉर्नचा वापर करणाऱ्या दुचाकीचालकांविरुद्ध पोलिसांनी कारवाई करण्यास सुरुवात केली आहे. सायलेन्सरमध्ये फेरफार (मॉडिफिकेशन) करणाऱ्या २७४ दुचाकीचालकांविरुद्ध कारवाई केली. त्यांच्याकडून पावणेतीन लाख रुपयांचा दंड वसूल करण्यात आला आहे.**




गेल्या काही वर्षांपासून फेरफार केलेले सायलेन्सर बुलेटला बसविण्याचे प्रकार वाढले आहेत. अशा प्रकारच्या सायलेन्सरमधून फटाक्यांसारखा आवाज येतो. दुचाकीस्वार कणकर्कश हॉर्नचा वापर करतात. रात्री-अपरात्री उपनगरात फटाक्यांसारखा आवाज काढत बुलेटचालक जातात. अशा प्रकारच्या आवाजांमुळे नागरिकांना विशेषत: ज्येष्ठ नागरिकांना त्रास होतो. याबाबत नागरिकांनी वेळोवेळी पोलिसांकडे तक्रारी केल्या होत्या. सायलेन्सरमधून फटाक्यासारखा आवाज काढणारे बुलेटचालक, तसेच कर्णकर्कश हॉर्नचा वापर करणाऱ्या दुचाकीस्वारांविरुद्ध पोलिसांनी कारवाईचा इशारा दिला आहे. दुचाकीस्वार, बुलेटचालकांना फटाक्यासारखा आवाज काढणारे सायलेन्सर बसवून देणाऱ्या गॅरेजचालकांविरुद्ध पोलिसांनी कडक भूमिका घेतली आहे.

सायलेन्सरमध्ये बेकायदा फेरफार करणारे दुचाकीचालक आणि गॅरेजचालकांविरुद्ध 'ऑपरेशन मॉडिफिकेशन' ही मोहीम हाती घेण्यात आली आहे. शहरातील वेगवेगळ्या पोलीस ठाण्यांच्या हद्दीत ही कारवाई सुरू करण्यात आली आहे. गेल्या तीन दिवसात २७४ दुचाकीस्वारांविरुद्ध कारवाई करण्यात आली. त्यांच्याकडून दोन लाख ७४ हजार रुपयांचा दंड वसूल करण्यात आला आहे. वाहतूक शाखेचे पोलीस आयुक्त डॉ. संदीप भाजीभाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली.

### ८४ सायलेन्सर जप्त

'वाहतूक पोलिसांनी फटाक्यासारखा आवाज काढणाऱ्या दुचाकीचालकांचे सायलेन्सर काढून ते जप्त केले आहेत. पोलिसांनी ८४ सायलेन्सर जप्त केले आहेत. यापुढील काळात फटाक्यासारखा आवाज काढणाऱ्या सायलेन्सरचा वापर करणाऱ्या दुचाकीचालकांविरुद्ध कडक कारवाई करण्यात येणार आहे. ही मोहीम यापुढील काळात सुरू राहणार आहे. दुचाकीस्वारांना वाहतूक नियमांचे पालन करावे', असे आवाहन पोलीस उपायुक्त डॉ. संदीप भाजीभाकरे यांनी केले आहे.

# पिंपरी-चिंचवाडच्या वाहनधारकांना मोठा दिलासा!

## आ'. महेश लांडगे यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश; मंत्रिमंडळाची मंजुरी, १२ पदांना मान्यता

**महाईन्यूज** | पिंपरी-चिंचवड

**पिंपरी-चिंचवड शहरासाठी स्वतंत्र विशेष मोटार वाहन न्यायालय स्थापन करण्यास राज्य मंत्रिमंडळाने मंजुरी दिली असून, शहराच्या न्यायिक आणि प्रशासकीय विकासाच्या दृष्टीने हा अत्यंत महत्त्वाचा निर्णय मानला जात आहे. या निर्णयामागे भाजपा आमदार महेश लांडगे यांनी गेल्या अनेक वर्षांपासून केलेला सातत्यपूर्ण पाठपुरावा आणि शासन स्तरावरील प्रभावी समन्वय निर्णायक ठरला आहे.**




पिंपरी-चिंचवड शहराची झपाट्याने वाढणारी लोकसंख्या, वाहनांची प्रचंड वाढ, वाढते अपघात आणि मोटार वाहन कायद्यांतर्गत दाखल होणाऱ्या प्रकरणांची संख्या लक्षात घेता स्वतंत्र विशेष न्यायालयाची मागणी सातत्याने केली जात होती. आतापर्यंत अशी प्रकरणे पुणे न्यायालयात चालत असल्याने नागरिक, पोलीस यंत्रणा आणि वकिलांना मोठा वेळ व खर्च सहन करावा लागत होता.

आमदार महेश लांडगे यांनी ही बाब राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निदर्शनास आणून दिली. तसेच, राज्य शासन, विधी व न्याय विभाग आणि संबंधित अधिकाऱ्यांकडे पाठपुरावा केला. या प्रयत्नांना अखेर यश मिळाले असून, राज्य मंत्रिमंडळाने पिंपरी-चिंचवड येथे विशेष मोटार वाहन न्यायालय स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे. न्यायालयाच्या स्थापनेसाठी आवश्यक १२ पदांना मंजुरी देण्यात आली आहे. यामध्ये प्रथम वर्ग न्यायाधीश, लघुलेखक, सहाय्यक अधीक्षक, वरिष्ठ लिपिक, कनिष्ठ लिपिक तसेच शिपाई आदी पदांचा समावेश आहे. यासाठी सुमारे १.२७ कोटी रुपयांच्या खर्चालाही मंजुरी देण्यात आली आहे.




या न्यायालयामुळे मोटार वाहन कायद्याशी संबंधित प्रकरणांचा स्थानिक पातळीवर जलद निपटारा होणार आहे. अपघात, वाहतूक नियमभंग, विमा दावे आणि अन्य वाहनविषयक प्रकरणांमध्ये नागरिकांना तातडीने न्याय मिळण्यास मदत होईल. तसेच पोलिसांचा वेळ वाचून न्यायालयीन प्रक्रियेत अधिक कार्यक्षमता येणार आहे.

> “पिंपरी-चिंचवड हे राज्यातील वेगाने विकसित होणारे शहर आहे. शहराच्या गरजा लक्षात घेऊन स्वतंत्र विशेष मोटार वाहन न्यायालयाची मागणी सातत्याने शासनाकडे मांडली होती. राज्य सरकारने ती मान्य केल्याने नागरिकांना जलद, सुलभ आणि स्थानिक पातळीवर न्याय मिळेल. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि राज्य मंत्रिमंडळाचे मी मनःपूर्वक आभार मानतो. शहराच्या सर्वांगीण विकासासाठी माझा पाठपुरावा यापुढेही कायम राहील.”
>
> **- महेश लांडगे, आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.**

### महत्त्वाचे मुद्दे

- पिंपरी-चिंचवडसाठी स्वतंत्र विशेष मोटार वाहन न्यायालयाला मंजुरी.
- आमदार महेश लांडगे यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश.
- १२ नवीन पदांना आणि सुमारे १.२७ कोटी खर्चाला मान्यता.
- मोटार वाहन प्रकरणांचा स्थानिक पातळीवर जलद निपटारा.
- नागरिक, पोलीस आणि वकिलांची वेळ, खर्च वाचणार; न्यायप्रक्रियेला गती मिळणार.

# ताथवडेतील पोदार इंटरनॅशनल शाळेचे गेट कोसळून सुरक्षारक्षकाचा मृत्यू




**महाईन्यूज** | पिंपरी-चिंचवड

**ताथवडे येथील पोदार इंटरनॅशनल शाळेच्या आवारातील जड लोखंडी स्लायडिंग गेट अंगावर कोसळून गंभीर जखमी झालेल्या सुरक्षारक्षकाचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. ही घटना ३१ जुलै रोजी घडली असून, रविवारी (२ ऑगस्ट) उपचारादरम्यान संजय नागनाथ कांबळे (वय ५२, रा. ताथवडे) यांचा मृत्यू झाला.**

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, शाळेची बस आल्यानंतर कांबळे लोखंडी स्लायडिंग गेट उघडत होते. त्यावेळी स्टॉपरवरून गेट पुढे सरकून त्यांच्या अंगावर कोसळले. यात ते गंभीर जखमी झाले. त्यांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. मात्र, उपचार सुरू असताना त्यांचा मृत्यू झाला.

या प्रकरणी वाकड पोलिस ठाण्यात सध्या आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. घटनेची सखोल चौकशी सुरू असून, तपासानंतर पुढील कायदेशीर कारवाईबाबत निर्णय घेतला जाणार आहे.

“शाळेची बस आल्यानंतर लोखंडी स्लायडिंग गेट उघडताना ही घटना घडली. या प्रकरणात आकस्मिक मृत्यूची नोंद केली आहे. सखोल चौकशीनंतर पुढील कायदेशीर कारवाईबाबत निर्णय घेतला जाईल,” असे वाकडचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक विठ्ठल साळुंखे यांनी सांगितले. दरम्यान, या घटनेनंतर विद्यार्थ्यांच्या सुरक्षेबाबत पालकांकडून चिंता व्यक्त केली जात आहे. विद्यार्थ्यांची वर्दळ असलेल्या परिसरातील जड गेटची नियमित तपासणी, सुरक्षा ऑडिट आणि देखभाल करण्यात आली होती का, याची चौकशी करण्याची मागणी होत आहे. तसेच दोषी आढळणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणीही होत आहे.

### विद्यार्थ्यांच्या सुरक्षेबाबत पालकांची चिंता

या दुर्घटनेनंतर शाळेतील विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा मुद्दाही ऐरणीवर आला आहे. विद्यार्थ्यांची वर्दळ असलेल्या परिसरातील जड लोखंडी गेटची नियमित तपासणी केली जात होती का, त्याचे सुरक्षा ऑडिट झाले होते का, तसेच गेटच्या देखभाल-दुरुस्तीची योग्य ती कार्यवाही करण्यात आली होती का, असे प्रश्न पालकांकडून उपस्थित केले जात आहेत. घटनेची जबाबदारी निश्चित करून संबंधितांवर लागू कायदेशीर तरतुदींनुसार कारवाई करावी आणि या प्रकरणाची सखोल चौकशी करावी, अशी मागणी विविध स्तरांतून होत आहे. त्यामुळे पोलिसांच्या तपासात गेटची स्थिती, देखभाल आणि सुरक्षा व्यवस्थेबाबत कोणती माहिती समोर येते, याकडे लक्ष लागले आहे.

### शाळेचे गेट कोसळून सुरक्षारक्षकाचा मृत्यू

ताथवडेतील पोदार इंटरनॅशनल शाळेचे लोखंडी स्लायडिंग गेट अंगावर कोसळून गंभीर जखमी झालेले सुरक्षारक्षक संजय कांबळे (५२) यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. ३१ जुलैला ही घटना घडली होती. या प्रकरणी वाकड पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली असून, चौकशीनंतर पुढील कारवाई केली जाणार आहे.

> शाळेची बस आल्यानंतर लोखंडी स्लायडिंग गेट उघडताना ही घटना घडली. या प्रकरणात आकस्मिक मृत्यूची नोंद केली आहे. सखोल चौकशीनंतर पुढील कायदेशीर कारवाईबाबत निर्णय घेतला जाईल. **- विठ्ठल साळुंखे, वरिष्ठ पोलिस निरीक्षक, वाकड पोलिस ठाणे.**



## भूमिका

**पाणी हा निसर्गाचा वरदहस्त असला, तरी त्याच्या वाटपावरून राज्यांच्या सीमा आखल्या गेल्या की संघर्ष अटळ होतो. कावेरीचा ताजा वाद हा केवळ दोन राज्यांतील पाण्याचा प्रश्न नसून, बदलत्या हवामानाच्या पार्श्वभूमीवर भारताच्या संघराज्य व्यवस्थेसमोरील गंभीर आव्हान आहे.**

# कावेरीचे पाणी पेटले; 'अस्मिते'चा बांध कधी फुटणार?



दक्षिण भारताची जीवनवाहिनी मानली जाणारी कावेरी ऐन पावसाळ्यात पुन्हा राजकीय संघर्षाचे केंद्र बनली आहे. कर्नाटक आणि तामिळनाडू यांच्यातील हा जलविवाद काही दशकांचा नाही, तर त्याची मुळे ब्रिटिशकालीन करारांपर्यंत जातात. पावसाचे प्रमाण समाधानकारक असतानाही पाण्याच्या वाटपावरून निर्माण होणारा तणाव पाहता, प्रश्न केवळ पाण्याच्या उपलब्धतेचा आहे की प्रादेशिक अस्मितेचा, हा विचार करण्याची वेळ आली आहे.

१८९२ आणि १९२४ मध्ये तत्कालीन म्हैसूर संस्थान आणि मद्रास प्रेसिडेन्सी यांच्यात झालेले करार या वादाची पायाभरणी करणारे ठरले. १९२४च्या कराराची मुदत १९७४मध्ये संपल्यानंतर कर्नाटकने जुन्या करारांना अन्यायकारक ठरवत सिंचन प्रकल्पांना गती दिली. दुसरीकडे, तामिळनाडूने कावेरीच्या पाण्यावर आपला ऐतिहासिक हक्क असल्याची भूमिका कायम ठेवली. परिणामी, पाणी हा विकासाचा विषय न राहता अस्मितेचा मुद्दा बनत गेला.

वाद मिटवण्यासाठी १९९०मध्ये कावेरी जलविवाद न्यायाधिकरण स्थापन करण्यात आले. न्यायाधिकरणाचा २००७चा निर्णय आणि त्यानंतर सर्वोच्च न्यायालयाचा २०१८चा निकाल यामुळे पाणीवाटपाला कायदेशीर चौकट मिळाली. सर्वोच्च न्यायालयाने नदीचे पाणी हे कोणत्याही एका राज्याची मालमत्ता नसून सामायिक नैसर्गिक संपत्ती असल्याचे स्पष्ट केले. मात्र, कमी पाऊस पडला की कायदेशीर तत्त्वांपेक्षा राजकीय दबाव आणि प्रादेशिक भावना वरचढ ठरतात, ही वस्तुस्थिती आहे.

कावेरीचा प्रश्न महाराष्ट्रासाठीही धडा देणारा आहे. कृष्णा नदीच्या पाणीवाटपापासून आलमट्टी धरणाच्या उंचीपर्यंत अनेक प्रश्न महाराष्ट्र आणि कर्नाटक यांच्यात वादाचे कारण ठरले आहेत. आलमट्टीच्या पाणीसाठ्यामुळे सांगली आणि कोल्हापूर परिसरातील पूरस्थितीवर परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जाते. त्यामुळे आंतरराज्यीय जलव्यवस्थापनात केवळ पाण्याचे वाटप नव्हे, तर पूरनियंत्रण आणि धरण व्यवस्थापनाचाही समन्वय आवश्यक आहे.

गोदावरी खोऱ्यातील प्रश्न तर महाराष्ट्राच्या अंतर्गत जलवाटपातील विसंगती अधोरेखित करतो. नाशिक-अहिल्यानगर भागातील पाणी आणि मराठवाड्याच्या जायकवाडी धरणासाठीच्या पाण्याचा प्रश्न वारंवार संघर्ष निर्माण करतो. कायदे आणि लवादांचे निर्णय असतानाही स्थानिक राजकारण आणि विभागीय अस्मिता आड येत असतील, तर केवळ कायदेशीर यंत्रणा पुरेशी नाही.

आज हवामान बदलामुळे पावसाचे स्वरूप अनिश्चित झाले आहे. एका वर्षी अतिवृष्टी, तर दुसऱ्या वर्षी दुष्काळ, अशी परिस्थिती निर्माण होत असताना पारंपरिक पाणीवाटपाच्या चौकटींचा पुनर्विचार करणे गरजेचे आहे. नदीला राज्यांच्या सीमांमध्ये विभागण्याऐवजी संपूर्ण नदीखोऱ्याचा एकत्रित विचार करणारी 'बेसिन-वाइझ वॉटर मॅनेजमेंट' व्यवस्था उभी करावी लागेल.

पाण्याचा प्रत्येक थेंब राजकीय घोषणांपेक्षा अधिक मौल्यवान आहे. त्यामुळे न्यायालयीन लढाया आणि रस्त्यावरील आंदोलनांपलीकडे जाऊन जलपुनर्भरण, पाणी बचत, पीक पद्धतीतील बदल आणि राज्यांमधील पारदर्शक समन्वय यावर भर देणे ही काळाची गरज आहे. अन्यथा भविष्यातील संघर्ष सीमा किंवा जमिनीसाठी नव्हे, तर पाण्याच्या प्रत्येक थेंबासाठी होतील, हा कावेरीचा इशारा गांभीर्याने घ्यावा लागेल.

## प्रासंगिक »

# सत्य आणि असत्य

**एकदा एका राजाला एका ज्योतिषाने भविष्य सांगितले, "महाराज, आपल्या डोळ्यांसमोरच आपल्या नातेवाईकांचा अंत होईल." हे ऐकून राजा दुःखी आणि अस्वस्थ झाला. त्याला हे भविष्य अजिबात सहन झाले नाही.**

राजाने दुसऱ्या ज्योतिष्याला बोलावून याच भविष्याबद्दल विचारले. दुसऱ्या ज्योतिष्याने परिस्थिती ओळखून तेच भविष्य वेगळ्या शब्दांत सांगितले. तो म्हणाला, "महाराज, आपल्या नातेवाईकांपेक्षा आपले आयुष्य अधिक आहे. आपण त्यांच्यापेक्षा दीर्घायुषी व्हाल."

हे ऐकून राजा आनंदी झाला आणि त्याने ज्योतिष्याला बक्षीस दिले. प्रत्यक्षात दोन्ही ज्योतिष्यांनी सांगितलेल्या भविष्याचा अर्थ एकच होता. मात्र, पहिल्या ज्योतिष्याने कटू सत्य स्पष्ट शब्दांत सांगितले होते, तर दुसऱ्याने तेच सत्य गोड शब्दांत मांडले.

- तात्पर्य : **सत्य कितीही कटू असले तरी ते बदलत नाही. मात्र, सत्य सांगण्याची पद्धत समोरच्या व्यक्तीच्या मनावर मोठा परिणाम करू शकते. त्यामुळे सत्य लपवू नये; ते योग्य आणि समजूतदार शब्दांत मांडावे.**

सार्वजनिक जीवनात सभ्य भाषा वापरणे ही लोकशाहीची मूलभूत अपेक्षा मानली जाते. मात्र, दिल्लीतील जंतरमंतरवरील आंदोलनात काही तरुणांनी केलेली शिवीगाळ, तीव्र उपहास आणि आक्रमक भाषेचा वापर सध्या चर्चेचा विषय ठरला आहे.

# संतापाची भाषा की प्रतिकाराचे हत्यार?



काहींनी या भाषेला संतापाची स्वाभाविक अभिव्यक्ती मानून समर्थन केले, तर काहींनी ती लोकशाहीच्या मूल्यांना न शोभणारी असल्याचे म्हटले. या वादाकडे केवळ नैतिकतेच्या चष्म्यातून न पाहता त्यामागील मानसशास्त्रीय, सामाजिक आणि राजकीय कारणांचाही विचार करणे आवश्यक आहे.

मानसशास्त्रीयदृष्ट्या पाहता, राग, अपमान, अन्याय किंवा असहायतेची भावना तीव्र झाली की माणूस शिवीगाळीचा आधार घेतो. अनेकदा त्या शब्दांमागे कोणाला दुखावण्याचा ठोस हेतू नसतो; ती दडपलेल्या भावनांची वाट मोकळी करणारी प्रतिक्रिया असते. प्रेशर कुकरच्या शिट्टीप्रमाणे शिवी क्षणभर मानसिक ताण कमी करू शकते. विशेषतः तरुण वयातील भावनिक तीव्रता लक्षात घेतली तर अशा प्रतिक्रियांचे सामाजिक संदर्भ समजून घेणे गरजेचे आहे.

मात्र, यामागे केवळ वैयक्तिक संताप नाही. गेल्या काही वर्षांत सामाजिक माध्यमांवर विरोधकांना हिणकस भाषा वापरून लक्ष्य करण्याची प्रवृत्ती वाढली आहे. राजकीय नेते आणि सार्वजनिक व्यक्तीही अनेकदा आक्रमक शब्दप्रयोग करताना दिसतात. परिणामी, शिवीगाळ आणि अपमानास्पद भाषा हळूहळू सार्वजनिक चर्चेचा 'सामान्य' भाग बनत आहे. जागतिक डिजिटल संस्कृतीचा प्रभाव असलेल्या जेन-झी पिढीच्या भाषाशैलीतही त्याचे प्रतिबिंब दिसते. भाषा ही केवळ संवादाचे साधन नसते; ती सत्ता आणि प्रतिकाराचे हत्यारही असते. आपला आवाज ऐकला जात नाही, अशी भावना निर्माण झाली की उपेक्षित समूह अधिक तीव्र भाषा वापरून आपले अस्तित्व अधोरेखित करण्याचा प्रयत्न करतात. त्यामुळे आंदोलनातील आक्रमक भाषा ही कधी कधी दडपलेल्या संतापाची सामूहिक अभिव्यक्ती ठरू शकते.

परंतु संताप समजून घेणे आणि शिवीगाळीचे समर्थन करणे यात फरक आहे. महात्मा गांधी आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी अन्यायाविरोधात अत्यंत ठाम भूमिका घेतली; पण त्यांच्या विचारांची ताकद वैयक्तिक अपमानात नव्हती. संयमी, तर्कशुद्ध आणि धारदार भाषेतूनही सत्तेला जाब विचारता येतो, हे त्यांनी सिद्ध केले.

आजच्या जेन-झी पिढीकडे ऊर्जा, धाडस आणि परिवर्तनाची इच्छा आहे. हीच ऊर्जा लोकशाहीला नवी दिशा देऊ शकते. मात्र, त्या ऊर्जेला विवेकाची जोड मिळणे आवश्यक आहे. शिवीगाळ क्षणभर टाळ्या मिळवू शकते; पण विचारांची ताकद आणि संयमी भाषा दीर्घकाळ समाजाचे मन जिंकते. आंदोलनाचा आवाज मोठा असण्यापेक्षा तो न्याय्य, तर्कशुद्ध आणि परिणामकारक असणे अधिक महत्त्वाचे आहे.

## ।। अभंगवाणी ।।



नाम साराचेही सार।
शरणागत यमकिंकर ।।

।।। उत्तमा उत्तम।
वाचे बोला पुरुषोत्तम ।।२।।

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक.** (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# अर्थ खात्यावर राष्ट्रवादीचाच हक्क

## खातं सुनेत्रा पवारांकडे सोपविण्याची NCP नेत्याची फडणवीसांकडे मागणी

**महाईन्यूज । मुंबई**

**राष्ट्रवादीकडे अर्थखातं देण्याबाबत वारंवार विविध वक्तव्य समोर येत असतात. आता राष्ट्रवादीच्या माजी आमदाराने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना सुनेत्रा पवार यांच्याकडे अर्थखातं देण्याची विनंती केली आहे. "सुनेत्रा पवारांकडे अर्थखातं देण्याची भावना मुख्यमंत्री फडणवीस यांनीच बोलून दाखवली होती. तसेच, या खात्यावर राष्ट्रवादीचाच हक्क आहे. मुख्यमंत्र्यांनी दिलेला शब्द पाळावा, त्यांच्या निर्णयाकडे तमाम राज्याचे लक्ष लागले आहे", असे राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते अमोल मिटकरींनी म्हटले आहे.**





अजित पवार यांच्या निधनानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हे खातं स्वत:कडे घेतले. पण, अर्थखातं राष्ट्रवादी सोपवले जावे अशी मागणी राष्ट्रवादीचे नेते करत आहेत. अमोल मिटकरींनी देखील याबाबत आता एक्सवर पोस्ट करुन देवेंद्र फडणवीसांना विनंती केली आहे. "अजित पवारांनंतर सुनेत्रा वहिनीकडे ही जबाबदारी अर्थसंकल्प मांडल्यावर देण्याची भावना माननीय मुख्यमंत्र्यांनी जाहीर बोलून दाखविली होती व तसा त्या खात्यावर हक्कही राष्ट्रवादीचाच! राज्यभरातील लाखो राष्ट्रवादीचे कार्यकर्ते आजही आपल्या वचनपुर्तीची अपेक्षेने वाट पाहत आहेत", अशी पोस्ट मिटकरींनी केली आहे.

"महायुतीतील प्रत्येक घटक पक्षाचा स्वाभिमान जपला गेला पाहिजे", असे मिटकरींनी पुढे पोस्टमध्ये म्हटले आहे. राष्ट्रवादी काँग्रेसबाबत दिलेले आश्वासन पूर्ण करून अर्थखाते पक्षाकडे सोपवावे, अशी विनंती त्यांनी मुख्यमंत्र्यांना केली आहे. यामुळे महायुतीतील विश्वास अधिक दृढ होऊन कार्यकर्त्यांच्या मनातील संभ्रम दूर होईल. राष्ट्रवादी काँग्रेसच्या सर्व आमदारांनीही पक्षाच्या स्वाभिमानासाठी कार्यकर्त्यांच्या भावना मुख्यमंत्र्यांपर्यंत ठामपणे पोहोचविण्यात पुढाकार घ्यावा असे आवाहनही मिटकरींनी केले आहे.

### शब्द पाळण्याची विनंती

"दिलेला शब्द पाळला जावा, एवढीच कार्यकर्त्यांची अपेक्षा आहे", असे म्हणत मिटकरींनी, "शब्दाला किंमत असते. तो पाळला गेला तर विश्वास वाढतो; आणि विश्वास टिकला तरच युती अधिक मजबूत होते. आपल्या निर्णयाकडे तमाम राज्याचे लक्ष लागून आहे", असे पोस्टच्या अखेरीस म्हटले आहे.

# देशातील ५८ पैकी ३८ व्याघ्रप्रकल्प संकटात; ९ ठिकाणी वाघच नाहीत


**महाईन्यूज । नागपूर**

**देशातील वाघांची संख्या वाढून भारतात जगातील सुमारे ७५ टक्के वाघ असल्याचा दावा केंद्र सरकारकडून केला जात आहे. मात्र, राष्ट्रीय व्याघ्रसंवर्धन प्राधिकरणाच्या (एनटीसीए) नवीन अहवालाने व्याघ्रसंवर्धनातील गंभीर वास्तव समोर आणले. देशातील ५८ व्याघ्रप्रकल्पांपैकी तब्बल ३८ प्रकल्पांमध्ये भक्ष्य प्राण्यांची संख्या घटली आहे, अधिवासाचा दर्जा खालावला आहे. याशिवाय नऊ व्याघ्रप्रकल्पांपैकी काहींमध्ये वाघच नाहीत, तर काहींमध्ये संख्या अत्यंत कमी असल्याचे अहवालात नमूद करण्यात आले आहे.**

राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरणाच्या 'रोडमॅप फॉर ॲक्टिव्ह मॅनेजमेंट ऑफ टायगर्स इन इंडिया' या अहवालातील विश्लेषण २०२२ च्या अखिल भारतीय व्याघ्र गणनेवर आधारित आहे. २०२७ मध्ये ताजी गणना जाहीर होणार आहे. या अहवालानुसार, केवळ २० व्याघ्रप्रकल्पांमध्ये दर्जेदार अधिवास आणि पुरेसा भक्ष्यसाठा या दोन्ही बाबी समाधानकारक आहे. त्याठिकाणी वाघांची संख्या स्थिर आणि वाढती आहे. उर्वरित बहुतांश प्रकल्पांमध्ये भक्ष्यसाखळी, अधिवास किंवा दोन्ही बाबतीत गंभीर उणिवा आहेत. विशेष म्हणजे ५८ पैकी ३६ व्याघ्रप्रकल्पांमध्ये भक्ष्य प्राण्यांची कमतरता ही प्रमुख समस्या असल्याचे स्पष्ट झाले आहे.

मध्यप्रदेश, महाराष्ट्र, कर्नाटक, तामिळनाडू, केरळ, उत्तराखंड, बिहार, आसाम आणि सुंदरबन या भागांत व्याघ्रसंवर्धनाचे चांगले परिणाम दिसून आले आहेत. मात्र उर्वरित अनेक व्याघ्रप्रकल्पांमध्ये आक्रमक वनस्पती हटविणे, अधिवास सुधारणा, तृणभक्षी प्राण्यांची संख्या वाढविणे आणि संरक्षण यंत्रणा मजबूत करणे आवश्यक आहे. तसेच व्याघ्र मार्गिकांची (कॉरिडॉर) ओळख करून त्यांचे संवर्धन करणे ही भविष्यातील मोठी गरज असल्याचे यात अभ्यासकांनी नोंदवले आहे.

२०२२च्या व्याघ्रगणनेत मिझोराममधील दाम्पा, तेलंगणातील कावल, ओडिशातील सातकोसिया, महाराष्ट्रातील सह्याद्री आणि अरुणाचल प्रदेशातील कमलांग या व्याघ्रप्रकल्पांमध्ये निवासी वाघांची नोंदच झालेली नाही. झारखंडमधील पलामू आणि पश्चिम बंगालमधील बक्सा येथे केवळ एक किंवा त्याहून कमी वाघ आढळले आहेत. बक्सामध्ये छायाचित्रित झालेला वाघ भूतानमधून आलेला असण्याची शक्यता तज्ज्ञांनी व्यक्त केली आहे. याशिवाय छत्तीसगडमधील इंद्रावती, उदंती-सीतानदी आणि गुरु घासीदास-तमोर पिंगला या व्याघ्रप्रकल्पांमध्येही वाघांची संख्या अत्यंत कमी असल्याचे अहवालात नमूद करण्यात आले आहे.



# पंतप्रधान मोदींनी माफी मागावी

## मल्लिकार्जुन खरगे विद्यार्थ्यांवरील लाठीचार्जप्रकरणी आक्रमक

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**नीट पेपरफुटीच्या विरोधात कॉंक्रोच जनता पार्टीच्यावतीने दिल्लीत करण्यात आलेल्या आंदोलनादरम्यान पोलिसांनी विद्यार्थ्यांवर केलेल्या लाठीचार्जच्या घटनेवरून विरोधक आणि सत्ताधाऱ्यांमध्ये आरोप-प्रत्यारोपाने राजकारण तापलेलं आहे. यावरून लोकसभा आणि राज्यसभेतही मोठा गदारोळ झाल्याचं पाहायला मिळालं. गेल्या काही दिवसांत अनेकदा दोन्ही सभागृहाचं कामकाज गदारोळामुळे स्थगित करावं लागलं.**





मोर्चादरम्यान दिल्ली पोलिसांनी विद्यार्थ्यांवर केलेल्या कारवाईवरून मल्लिकार्जुन खरगे हे पुन्हा एकदा आक्रमक झाले आहेत. 'पंतप्रधान मोदींनी चूक मान्य करून माफी मागावी आणि विद्यार्थ्यांवर झालेल्या लाठीचार्ज प्रकरणावर अमित शाह यांनी सभागृहात निवेदन सादर करावं', अशी मागणी मल्लिकार्जुन खरगे यांनी केली आहे.

"राज्यसभेच्या खासदारांनी आज (६ ऑगस्ट) अध्यक्षांची भेट घेऊन मागणी केली आहे की, पंतप्रधान मोदी यांनी माफी मागावी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी सभागृहात निवेदन सादर करावं. त्यामुळे त्यांना सभागृहात बोलवावं. जगाच्या दुसऱ्या एखाद्या ठिकाणी काय चाललंय? याचं उत्तर आम्ही मागत नाहीत", असं म्हणत मल्लिकार्जुन खरगे यांनी सरकारवर टीका केली.

"आम्ही विशेषतः पोलिसांनी विद्यार्थ्यांवर केलेल्या कारवाईबाबत विचारणा करत आहोत. मात्र, तरीही पंतप्रधान मोदी आणि अमित शाह हे सभागृहात येण्यास तयार नाहीत. विद्यार्थ्यांना त्यांचं आंदोलन मागे घेण्यास सांगायचं असतं तर सरकार तसं आवाहन करू शकलं असतं. पण तसं करण्यात आलं नाही. त्यामुळे यावर गृहमंत्री अमित शाह यांनी सभागृहात निवेदन सादर करावं अशी सर्वांची मागणी आहे असं आम्ही केंद्रीय संसदीय कामकाज मंत्र्यांना कळवलं आहे", असं मल्लिकार्जुन खरगे यांनी सांगितलं आहे.

"विद्यार्थ्यांवर लाठीचार्ज, कथित पेलेट गन्स अशा गोष्टींचा वापर विद्यार्थ्यांच्या विरोधात कधीही केला जाऊ नये, पण सरकारने हा वापर केला. आंदोलनावेळी विद्यार्थ्यांनी कोणताही उपद्रव केला नव्हता. सरकारी वाहनांचं नुकसान झालं नव्हतं. एखाद्या लोकप्रतिनिधीला अडवलं होतं का? नाही. मात्र, तरीही विद्यार्थ्यांवर ज्या पद्धतीने कारवाई करण्यात आली ती चुकीची होती", असं मल्लिकार्जुन खरगे यांनी म्हटलं आहे.

"लाठीचार्जचे आदेश कोणी दिले, याचा खुलासा अमित शाह यांनी सभागृहात करावा. पेलेट गन्सचा वापर करण्यास पोलीस अधिकाऱ्यांनी परवानगी दिली होती का? अश्रूधुराचा वापर पोलीस अधिकाऱ्यांनी केला होता का? अनेक तरुण, विद्यार्थी आणि विद्यार्थिनींना मारहाण का करण्यात आली? याबद्दल आम्ही प्रश्न उपस्थित करत आहोत. संसदेचं अधिवेशन सुरू होऊन १५ दिवस झाले, तरीही पंतप्रधान मोदी सभागृहात उपस्थित नाहीत आणि केंद्रीय गृहमंत्री उपस्थित नाहीत. त्यामुळे याचे दोन अर्थ निघतात. एक तर तुम्ही सभागृहाला जुमानत नाही किंवा तुम्ही घाबरलेले आहात", अशा शब्दांत मल्लिकार्जुन खरगे यांनी सरकारवर टीका केली.

# डोनाल्ड ट्रम्प थोडक्यात बचावले, वॉशिंग्टनच्या आकाशात थरार

**महाईन्यूज । अमेरिका**

**अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांना घेऊन जाणारे हेलिकॉप्टर प्रवासी विमानाच्या खूप जवळून गेल्याची घटना उघडकीस आली आहे. ट्रम्प यांच्या सुरक्षेच्या दृष्टीने वॉशिंग्टनमध्ये घडलेल्या या घटनेबाबत चिंता व्यक्त केली जात आहे. मंगळवारी डोनाल्ड ट्रम्प मरीन वन या हेलिकॉप्टरमधून प्रवास करत होते त्यावेळी ही घटना घडली. याप्रकरणी आता अमेरिकेच्या सुरक्षा यंत्रणांनी तपास सुरु केला आहे.**



समोर आलेल्या माहितीसानुसार, डोनाल्ड ट्रम्प यांना घेऊन मरीन वन हेलिकॉप्टर हवाई दलाच्या तळावर उतरण्यासाठी निघाले होते. दरम्यान याचवेळी वॉशिंगटनमधील रिगन राष्टीय विमानतळावरुन प्रवासी विमानाने उड्डाण घेतले. ट्रम्प यांना घेऊन जाणारे हेलिकॉप्टर आणि प्रवासी विमान अगदी जवळून गेल्याने आता तपास यंत्रणांकडून चिंता व्यक्त केली जात आहे. हवेत असताना हेलिकॉप्टर आणि विमानाची धडक झाली असती तर मोठा अपघात झाला असता. दरम्यान, मोठी दुर्घटना टळल्याची भावना व्यक्त केली जात आहे.

दरम्यान, ट्रम्प यांच्या मरिन वन हेलिकॉप्टरचे वैमानिक जगातिक सर्वोत्तम वैमानिकांपैकी असल्याचे व्हाईट हाऊसच्या प्रवक्त्या कुश देसाई यांना म्हटले आहे. त्यामुळे ट्रम्प यांना कोणताही धोका निर्माण होण्याचा प्रश्नच उद्भवत नाही, असे त्यांनी स्पष्ट केले. या घटनेला लॉस ऑफ सेपरेशन असे नाव देण्यात आले आहे. हवाई वाहतूक नियंत्रण विभागाने यावेळी दोन्ही विमानांच्या वैमानिकांमध्ये संवाद होता, असेही म्हटले आहे.




दरम्यान, या घटनेचा सखोल तपास केला जाणार असल्याचे अमेरिकी प्रशासनाने म्हटले आहे. मंगळवारी दुपारच्या सुमारास घडलेल्या या घटनेमुळे चिंता व्यक्त करण्यात आली.

### व्हाईट हाऊसकडून स्पष्टीकरण

डोनाल्ड ट्रम्प यांच्या जीवाला कोणताही धोका नव्हता असे स्पष्टीकरण व्हाईट हाऊसकडून देण्यात आले आहे. हवाई वाहतूक नियंत्रण विभागाच्या संवादात गोंधळ निर्माण झाल्याने ही घटना घडल्याचे न्यू यॉर्क टाईम्सच्या वृत्तात म्हटले आहे. दरम्यान, राष्ट्रीय वाहतूक आणि सुरक्षा मंडळाने या घटनेची गंभीर दखल घेतली असून, याप्रकरणाचा तपास सुरु केला आहे. मरीन वन आणि रिगन विमानतळाच्या संवादात गोंधळ कशामुळे निर्माण झाला? याचा तपास केला जात आहे.



# भाग्यश्री चर्चेत

मराठमोळी अभिनेत्री  भाग्यश्री बोरसे सध्या तिच्या नव्या फोटोशूटमुळे सोशल मीडियावर चांगलीच चर्चेत आहे. अल्पावधीतच दाक्षिणात्य चित्रपटसृष्टीत स्वतःची वेगळी ओळख निर्माण करणाऱ्या भाग्यश्रीने पुन्हा एकदा आपल्या स्टायलिश अंदाजाने चाहत्यांना भुरळ घातली आहे. तिचे नवीन फोटो सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत असून चाहत्यांकडून त्यावर भरभरून प्रतिक्रिया दिल्या जात आहेत.  भाग्यश्री बोरसे ही महाराष्ट्रातील छत्रपती संभाजीनगरची रहिवासी आहे. अभिनयाची आवड जपत तिने मनोरंजन क्षेत्रात पाऊल टाकले आणि आपल्या मेहनतीच्या जोरावर आज दक्षिणेतील चित्रपटसृष्टीतही विशेष स्थान मिळवले आहे. महाराष्ट्रातून जाऊन तेलुगू आणि तमिळ चित्रपटांमध्ये यश मिळवणाऱ्या मोजक्या अभिनेत्रींपैकी तिचे नाव घेतले जाते. भाग्यश्रीने आपल्या अभिनय कारकिर्दीची सुरुवात बॉलिवूडमधील छोट्या भूमिकांपासून केली. सुरुवातीच्या काळात तिने अनेक संधींचा योग्य उपयोग करत अभिनयातील कौशल्य सिद्ध केले. त्यानंतर तिने दाक्षिणात्य चित्रपटांकडे मोर्चा वळवला आणि तिथेही प्रेक्षकांची मने जिंकली. तिने तेलुगू चित्रपट 'लेनिन'मध्ये दाक्षिणात्य सुपरस्टार नागार्जुन यांचा मुलगा अखिल अक्किनेनी याच्यासोबत काम केले. या चित्रपटामुळे भाग्यश्रीला मोठी लोकप्रियता मिळाली. तिच्या अभिनयासोबतच तिच्या स्क्रीन प्रेझेन्सचेही कौतुक झाले.



# 'डीसी द ब्लडी व्हॅलेंटाइन'मध्ये वामिका

दिग्दर्शक लोकेश कनगराज लवकरच अभिनय करताना दिसून येणार आहे. त्याचा नवा चित्रपट 'डीसी द ब्लडी व्हॅलेंटाइन"चा ट्रेलर प्रदर्शित करण्यात आला आहे. या चित्रपटात नायिका म्हणून वामिका गब्बी झळकणार आहे. चित्रपटात ती  रोमान्ससोबत ॲक्शनही करताना दिसून येईल. याचा ट्रेलर एका अशा जगाची रोमांचक झलक दाखवितो, जेथे क्राइम, रोमान्स आणि सूड परस्परांशी धडकत असतात. देवदास (लोकेश कनगराज) केवळ स्वतःच्या भूतकाळापासून नव्हे तर कायद्यापासूनही पळण्याचा प्रयत्न करत असल्याचे ट्रेलरमध्ये दाखविण्यात आले आहे. एका पोलीस अधिकाऱ्याची हत्या होताच सर्वकाही बिघडून जाते आणि त्याच्या मारेकऱ्याचा शोध सुरू होतो. याचबरोबर एका गुन्हेगारी टोळीची चौकशी सुरु असते, जिने शस्त्रास्त्रs चोरली आहेत. ही दोन्ही प्रकरणे हळूहळू परस्परांशी जोडली जातात आणि देवदास गुन्हेगार, उग्रवादी आणि पोलिसांदरम्यान अडकून पडतो. अरुण मथेश्वरन याच्या दिग्दर्शनातील हा चित्रपट 7 ऑगस्ट रोजी प्रदर्शित होणार आहे. करण जौहरचे धर्मा प्रॉडक्शन्स हा चित्रपट उत्तर भारतात वितरित करणार आहे.

# 'स्पायडर मॅन ब्रँड न्यू डे' यशस्वी

जगभरातील प्रेक्षक सध्या स्पायडर मॅन ब्रँड न्यू डे या चित्रपटाचा आनंद घेत आहेत. मार्वल सिनेमॅटिक युनिव्हर्स म्हणजेच एमसीयूच्या या प्रोजेक्टवरून प्रेक्षकांमध्ये जबरदस्त क्रेझ दिसून येत आहे.  यात पीटर पार्कर म्हणजेच स्पायडर मॅनच्या पर्सनल जर्नीची इमोशनल कहाणी तसेच ॲक्शन ॲडव्हेंचरही दाखविण्यात आली आहे.

टॉम हॉलंडची मुख्य भूमिका असलेल्या सुपरहिरो चित्रपटावरून निर्मात्यांनी मोठी तयारी केली होती. याच्या ट्रेलरमध्ये पीटर पार्क स्वतःचा गमावलेला मित्र, हरवलेले प्रेम आणि नव्या ओळखीवरून अत्यंत भावुक असल्याचे अन् त्याचे लोकच त्याला ओळखू शकत नसल्याचे दाखविण्यात आले होते. तर ट्रेलरच्या उत्तरार्धात स्पायडर मॅन स्वतःच्या नव्या शत्रूसोबत संघर्ष करताना दिसून येतो.

याचबरोबर हल्कसोबत त्याची लढाई दाखविण्यात आली आहे. ट्रेलरमध्ये सर्वाधिक लक्ष पीटर पार्क आणि त्याची गर्लफ्रेंड एमजेमधील केमिस्ट्री वेधून घेते. प्रेयसीची भूमिका झेंडायाने साकारली आहे. झेंडाया ही खऱ्या आयुष्यात टॉम हॉलंडची प्रेयसी आहे. हा चित्रपट जगभरात 31 जुलै रोजी प्रदर्शित झाला आहे.



# पाकिस्तानचा कुस्तीपटू स्कॉटलंडमधून बेपत्ता

## कॉमनवेल्थ गेम्स 2026 नंतर स्कॉटलंडमध्ये पाकिस्तानचा खेळाडू अचानक बेपत्ता

**महाईन्यूज । पाकिस्तान**

**२०२६ राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेसाठी ग्लासगो येथे गेलेल्या अनेक देशांतील काही खेळाडू स्पर्धेनंतर बेपत्ता झाल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. स्पर्धा संपल्यानंतर आपल्या-आपल्या पथकांसह मायदेशी परतण्याऐवजी हे खेळाडू बेपत्ता झाल्याने खळबळ उडाली आहे.**



NBS आणि Pakistan Today या माध्यमांच्या वृत्तांनुसार, एकूण पाच बॉक्सर बेपत्ता असल्याची माहिती आहे. यामध्ये युगांडाचे चार आणि पाकिस्तानचा एक खेळाडू समाविष्ट आहे. युगांडाचे बॉक्सर मंगळवारी संघ मायदेशी परतण्यापूर्वी पथकात सहभागी झाले नाहीत, तर पाकिस्तानी बॉक्सर कुदरत उल्लाह याचा अधिकाऱ्यांनी शोध घेतला असता तो आपल्या खोलीत आढळला नाही. स्कॉटलंडमधील कायदा अंमलबजावणी यंत्रणांना अधिकृत निवासस्थानी राहणाऱ्या काही खेळाडू बेपत्ता झाल्याच्या अनेक तक्रारी प्राप्त झाल्या आहेत.

या प्रकरणाबाबत पोलिस स्कॉटलंडच्या प्रवक्त्याने सांगितलं, “काही खेळाडूंचा संपर्क तुटल्याच्या आणि ते हजर नसल्याच्या तक्रारी आम्हाला मिळाल्या आहेत. या प्रकरणातील परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी चौकशी सुरू असून, होम ऑफिसशी प्राथमिक स्तरावर समन्वय साधला जात आहे.” युगांडाच्या पथकप्रमुख (Chef de Mission) गॉडविन कयांग्वे यांनी सांगितलं की, पथकातील चार बॉक्सर दोन पुरुष आणि दोन महिला बेपत्ता का झाले, याची त्यांना कोणतीही कल्पना नाही. इब्राहिम केमिस, नुहू बट्टे, एमिली नाकालेमा आणि एंजेल कातुशाबे हे मंगळवारी युगांडाला परत जाणार होते.

बीबीसी स्कॉटलंडशी बोलताना कयांग्वे म्हणाले, “ते मायदेशी परत का गेले नाहीत, याबद्दल मला काहीच माहिती नाही. मात्र त्यांनी आपल्या टीम मॅनेजरशी संपर्क साधून परत येऊ असं सांगितलं होतं. त्यानंतर त्यांचे फोन बंद झाले. त्यामुळे त्यांनी निश्चितच शिबिराचे नियम मोडले आहेत, कारण कोणत्याही खेळाडूला परवानगीशिवाय पथक सोडण्याची मुभा नसते. त्यांचे व्हिसा ऑक्टोबरपर्यंत वैध आहेत, त्यामुळे आशा आहे की ते अखेरीस आपल्या देशात परततील.”

दरम्यान, पाकिस्तानी बॉक्सर तर आपला पासपोर्टही न घेता गायब झाल्याची माहिती समोर आली आहे. त्याचा पासपोर्ट टीम मॅनेजरकडे होता. पाकिस्तान बॉक्सिंग महासंघाच्या अधिकाऱ्यांनी सांगितलं की, त्या खेळाडूला शेवटचं पहाटे सुमारे २ वाजता हॉटेलच्या खोलीत पाहण्यात आलं होतं. सकाळी ९ वाजता पाकिस्तानला रवाना होण्यासाठी संपूर्ण संघ हॉटेलच्या लॉबीमध्ये जमणार होता, मात्र अधिकाऱ्यांनी त्याच्या खोलीत पाहिलं असता तो तेथे नव्हता.

२०१८ च्या गोल्ड कोस्ट राष्ट्रकुल स्पर्धेनंतरही ५० हून अधिक खेळाडू ऑस्ट्रेलियात बेकायदेशीररीत्या थांबले होते, अशी माहिती वृत्तांमध्ये देण्यात आली होती. तसेच, २०२४ च्या वर्ल्ड ऑलिम्पिक पात्रता स्पर्धेदरम्यान पाकिस्तानी बॉक्सर झोहेब रशीद याने आपल्या रूममेटची परकीय चलनातील रक्कम आणि मौल्यवान वस्तू घेऊन इटलीतील बुस्टो अर्सिझिओ शहरातून गायब झाल्याची घटना देखील समोर आली होती.

### अशा अनेक घटना पूर्वीपासून घडल्या आहेत

राष्ट्रकुल किंवा ऑलिम्पिक स्पर्धांनंतर खेळाडू बेपत्ता होण्याची ही काही नवीन बाब नाही. २०२२ च्या बर्मिंगहम राष्ट्रकुल स्पर्धेदरम्यान दोन बॉक्सर हॉटेलमधून बेपत्ता झाले होते. त्याच वेळी श्रीलंकेच्या पथकातील एक कुस्तीपटू, एक जुडोपटू आणि एक जुडो प्रशिक्षक हे कॉमनवेल्थ गावातून बेपत्ता झाल्याची नोंद झाली होती. त्यानंतरही विविध आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये अशा घटना अधूनमधून समोर आल्या असून, अनेक प्रकरणांमध्ये खेळाडूंनी चांगल्या संधी किंवा आश्रयाच्या शोधात यजमान देशातच थांबण्याचा प्रयत्न केल्याचे समोर आले आहे. त्यामुळे मोठ्या क्रीडा स्पर्धांनंतर खेळाडू बेपत्ता होण्याच्या घटनांकडे केवळ सुरक्षा नव्हे, तर सामाजिक, आर्थिक आणि स्थलांतराच्या दृष्टिकोनातूनही पाहिले जाते.

# कॉमनवेल्थ ‘गोल्डन बॉय’ दिलीप गावित ठाकरेंना न भेटताच माघारी परतला

**महाईन्यूज । नाशिक**

**नाशिक दौऱ्यावर असलेले महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे आणि राष्ट्रकूल स्पर्धेतील सुवर्णपदक विजेता खेळाडू दिलीप गावित यांची प्रस्तावित भेट वेळेच्या अभावामुळे होऊ शकली नाही. दिलीप गावित आणि त्यांचे प्रशिक्षक वैजनाथ काळे हे राज ठाकरे यांच्या भेटीसाठी आले होते.**




मिळालेल्या माहितीनुसार, मनसेच्या स्थानिक पदाधिकाऱ्यांनी या भेटीचे आयोजन केले होते. त्यानुसार दिलीप गावित व प्रशिक्षक वैजनाथ काळे नाशिक येथील विश्रामगृहावर पोहोचले. मात्र, राज ठाकरे यांच्या व्यस्त दिनक्रमामुळे भेटीसाठी वेळ लागू लागल्याने, "भेट द्यायची नव्हती तर बोलावलं कशाला?" असा प्रश्न प्रशिक्षकांनी सुरुवातीला पदाधिकाऱ्यांना विचारला. यानंतर मनसे पदाधिकाऱ्यांनी त्यांची समजूत काढण्याचा प्रयत्न केला.

दरम्यान, माध्यमांनी यासंदर्भात विचारणा केली असता, प्रशिक्षकांनी विषयावर पडदा टाकत आपली कोणतीही नाराजी नसल्याचे स्पष्ट केले. खेळाडूच्या सरावाची वेळ निश्चित असल्याने आणि पुढील सराव चुकवू नये यासाठी आपण निघत असल्याचे सांगत त्यांनी माघारी जाणे पसंत केले.

जिद्द आणि अथांग परिश्रमांच्या जोरावर नाशिक जिल्ह्यातील आदिवासी भागातील सुपुत्र दिलीप महादू गावित याने क्रीडा जगतात भारताची पताका पुन्हा एकदा उंच फडकावली. कॉमनवेल्थ पॅरा ॲथलेटिक्स स्पर्धेत पुरुषांच्या १०० मीटर T47 प्रकारात १०.७१ सेकंदांची विक्रमी वेळ नोंदवत दिलीपने सुवर्णपदकाला गवसणी घातली. दिलीपच्या या क्षमतेला योग्य दिशा देण्याचे काम त्याचे प्रशिक्षक वैजनाथ काळे यांनी केले. शालेय वयातच त्यांनी दिलीपमधील धावपटू ओळखला आणि त्याच्या पालकांची समजूत काढून त्याला क्रीडा क्षेत्राकडे वळवले.

### संघर्षमय प्रवास

नाशिकजवळील 'तोरण डोंगरी' या आदिवासी गावातील एका गरीब शेतकरी कुटुंबात जन्मलेल्या दिलीपचा इथपर्यंतचा प्रवास अत्यंत आव्हानात्मक राहिला आहे. वयाच्या अवघ्या पाचव्या वर्षी शेतात काम करताना झाडावरून पडल्याने त्याच्या हाताला गंभीर दुखापत झाली होती. अत्यंत हलाखीची परिस्थिती आणि योग्य वेळी वैद्यकीय उपचार न मिळाल्यामुळे जखमेत संसर्ग पसरला; परिणामी डॉक्टरांना त्याचा एक हात कापावा लागला. मात्र, या अपंगत्वावर मात करत दिलीपने आपल्या ध्येयाचा पाठलाग सोडला नाही.

स्मार्ट PCMC SMART CITY

# महाईन्यूज™

epaper.mahaenews.com

ePaper

। शुक्रवार ।

दि. 07 ऑगस्ट 2026 ।

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती


# प्रारूप 'डीपी' हरकतींचा गाजावाजा; प्रत्यक्षात सुनावणीला अत्यल्प प्रतिसाद?

## २,३४१ नोटिसा, पण दिवसभरात अवघे १२३ ते २५० हरकतदार उपस्थित



## अनेकांचा धक्कादायक दावा – "आम्ही हरकतच घेतली नव्हती!"





महाईन्यूज।
पिंपरी-चिंचवड

**पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या प्रारूप विकास आराखड्यावर (DP) दाखल झालेल्या तब्बल ५६ हजारांहून अधिक हरकतींचा आकडा वास्तवात किती विश्वासार्ह आहे? हा प्रश्न पहिल्याच दिवशी झालेल्या सुनावणीनंतर उपस्थित झाला आहे. कारण, पहिल्या दिवशी सुमारे २,३४१ हरकतदारांना नोटिसा पाठविण्यात आल्या असतानाही प्रत्यक्ष सुनावणीसाठी अवघे १२३ ते २५० नागरिक उपस्थित राहिल्याची माहिती समोर आली आहे.**

मंगळवारी सकाळी १०.३० ते सायंकाळी ६ या कालावधीत सुनावणी झाली. प्रशासनाने अंदाजे २,२५० नागरिकांना बोलावले असतानाही उपस्थिती अत्यल्प राहिली. यामुळे हरकतींच्या एकूण संख्येबाबत नव्याने प्रश्न निर्माण झाले आहेत.

### पहिल्याच दिवशी वास्तव समोर?


महापालिकेने विकास आराखड्यावर ५६,७७९ हरकती प्राप्त झाल्याचे जाहीर केले आहे. मात्र, पहिल्याच दिवशी सुनावणीला अत्यल्प प्रतिसाद मिळाल्याने या सर्व हरकती प्रत्यक्ष संबंधित नागरिकांनीच दाखल केल्या होत्या का? हा प्रश्न उपस्थित होत आहे.

### हरकतींचा आकडा कृत्रिमरीत्या वाढवला?

या पार्श्वभूमीवर काही नागरिकांनी आणि उपस्थितांनी असा संशय व्यक्त केला की, हरकतींचा आकडा फुगवण्यासाठी काही व्यक्तींनी इतरांच्या नावाने व मोबाईल क्रमांकांचा वापर करून अर्ज दाखल केले असावेत. त्यामुळे प्रत्यक्ष हरकतदार आणि अर्जातील नाव यामध्ये तफावत निर्माण झाल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. मात्र, या दाव्याला अद्याप कोणताही अधिकृत पुरावा किंवा प्रशासनाची पुष्टी उपलब्ध नाही. त्यामुळे हा मुद्दा तपासाचा विषय ठरू शकतो.

### हरकतच घेतली नव्हती; मग नोटीस कशी?

सुनावणीसाठी आलेल्या अनेक नागरिकांनी धक्कादायक दावा केला. "आम्ही विकास आराखड्यावर कोणतीही हरकत दाखल केलेली नाही. तरीही आमच्या नावाने नोटीस आली," असे अनेकांनी अधिकाऱ्यांसमोर सांगितल्याची माहिती मिळाली.काहींना आपण हरकत अर्ज केला होता, हेही आठवत नसल्याचे त्यांनी सांगितले. त्यामुळे संबंधित व्यक्तीच्या नावाने तिसऱ्याच व्यक्तीने हरकत दाखल केली का? असा गंभीर प्रश्न उपस्थित होत आहे.



# चाकण एमआयडीसी खड्डेमुक्त करा

## राष्ट्रीय महामार्ग, सार्वजनिक बांधकाम विभाग व पीएमआरडीएच्या रस्त्यांचा समावेश

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**चाकण एमआयडीसी परिसरातील राष्ट्रीय महामार्ग, सार्वजनिक बांधकाम विभाग तसेच पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (पीएमआरडीए) आणि एमआयडीसी यांच्या अखत्यारीतील सर्व रस्ते येत्या २५ ऑगस्टपर्यंत खड्डेमुक्त करण्यात यावेत. २५ ऑगस्ट नंतर आपण प्रत्यक्ष पाहणी करणार असल्याचे सांगून निर्धारित मुदतीनंतर अतिक्रमण काढली नाहीत तर कार्यवाही होणार तसेच रस्त्यांवरील खड्ड्यांमुळे अपघात झाल्यास संबंधित विभागाची जबाबदारी निश्चित करून नियमानुसार आवश्यक ती कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल.**



चाकण परिसरातील रस्त्यातील खड्डे, वाहतूक व्यवस्था, पावसाळ्यातील उपाययोजना तसेच नदी, नाल्यातील अतिक्रमणांचा आढावा घेण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित बैठकीत ते बोलत होते.

बैठकीस महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ प्रादेशिक कार्यालयाचे अधीक्षक अभियंता निलेश मोडवे, एमआयडीसीचे वरिष्ठ तांत्रिक सल्लागार संजयकुमार मांगीलवार, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (पीएमआरडीए) चे शिवकुमार गोपाल, चाकण वाहतूक शाखेचे सहाय्यक पोलिस आयुक्त गुलाब इनामदार, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ (एमएसआरडीसी)चे अधीक्षक अभियंता प्रवीण सुमंत यांच्यासह महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, सार्वजनिक बांधकाम विभाग, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण तसेच संबंधित विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी श्री. डुडी यांनी सांगितले की, चाकण परिसरातील नदी, नाले तसेच सार्वजनिक रस्त्यांवरील अतिक्रमणे संबंधितांनी एका महिन्याच्या आत स्वखर्चाने काढून घ्यावीत. मुदत संपल्यानंतरही अतिक्रमणे कायम राहिल्यास प्रशासनामार्फत ती हटविण्याची कारवाई करण्यात येईल. अतिक्रमण हटविण्यासाठी येणारा खर्च संबंधितांकडून वसूल करण्यात येईल. तसेच संबंधितांविरुद्ध प्रचलित कायदे व नियमांनुसार कारवाईही करण्यात येईल.

बैठकीत चाकण परिसरातील धोकादायक ठिकाणांचा आढावा घेण्यात आला. वाहनचालकांच्या सुरक्षिततेसाठी धोकादायक गतिरोधक काढून राष्ट्रीय रस्ते काँगेसच्या मानांकानुसार गतिरोधक उभारावेत, तसेच आवश्यक त्या ठिकाणी दिशादर्शक फलक, रस्ता चिन्हे, परावर्तक पट्ट्या आणि इतर सुरक्षा उपाययोजना तातडीने करण्यात याव्यात तसेच रस्त्यावर पार्किंग करणाऱ्यावर नियमानुसार दंड बसवून रस्त्यावर कोणीही पार्किंग करणार नाही अशा सूचनाही दिल्या. रस्ते दुरुस्तीची कामे युद्धपातळीवर हाती घेऊन सर्व यंत्रणांनी परस्पर समन्वयाने निश्चित कालमर्यादेत पूर्ण करावीत. नागरिकांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देत रस्त्यांवरील खड्डे आणि अतिक्रमणांच्या प्रश्नावर कोणतीही दिरंगाई सहन केली जाणार नाही, असेही जिल्हाधिकारी श्री. डुडी यांनी यावेळी स्पष्ट केले.

बैठकीत संबंधित विभागांच्या कामांचा आढावा घेऊन प्रलंबित कामे तातडीने पूर्ण करण्याच्या सूचनाही देण्यात आल्या.

### बैठकीत चाकण परिसरातील रस्त्यांच्या सद्यस्थितीचा आढावा

बैठकीत चाकण परिसरातील रस्त्यांच्या सद्यस्थितीचा सविस्तर आढावा घेण्यात आला. विशेषतः तळेगाव चौक, राणूबाईमळा, खराबवाडी, वाघजाई नगर–खराबवाडी रोड, म्हाळुंगे इंगळे येथील सर्व चौक, खालुंब्रे येथील सर्व चौक, शिंदे वासुली येथील सर्व चौक, आंबेठाण वाय कॉर्नर, कोरेगाव फाटा तसेच बिरदवडी फाटा, दवने मळा ते द्वारका सिटी रोड, कॉर्निंग कंपनी ते राष्ट्रीय महामार्ग पुणे -नाशिक या ठिकाणी खराब झालेल्या रस्त्यांमुळे वाहतुकीला अडथळे निर्माण होत असून अपघातांचा धोका वाढला असल्याची नोंद घेण्यात आली. या सर्व ठिकाणी तातडीने खड्डे बुजविणे, रस्त्यांची दुरुस्ती करणे, रस्त्यांच्या कडांची सुधारणा करणे तसेच आवश्यक त्या ठिकाणी सुरक्षा उपाययोजना राबविण्याबाबत संबंधित यंत्रणांना निर्देश देण्यात आले.

# सुनेत्राताई पवार यांच्यावरील आक्षेपार्ह वक्तव्याचा राष्ट्रवादी काँग्रेसकडून तीव्र निषेध

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**महाराष्ट्र राज्याच्या उपमुख्यमंत्री मा. सुनेत्राताई अजितदादा पवार यांच्याबाबत काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केलेल्या 'गुंगी गुडिया' या आक्षेपार्ह वक्तव्यावरून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात तीव्र संताप व्यक्त होत आहे. याचा निषेध करण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने निषेध आंदोलन करण्यात आले.**




> काँग्रेसच्या प्रदेशाध्यक्षांनीच राज्याच्या उपमुख्यमंत्री आदरणीय सुनेत्रावहिनी अजितदादा पवार यांच्याबाबत अवमानकारक भाषा वापरणे अत्यंत दुर्दैवी व निषेधार्य आहे. सुनेत्रावहिनींचा अपमान करणारे हे वक्तव्य केवळ त्यांचाचं नाही, दिवंगत लोकनेते स्व. अजितदादा पवार यांचाही अपमान आहे. तसेच सार्वजनिक जीवनात कार्यरत असलेल्या प्रत्येक महिलेचा अवमान करणारे हे कृत्य आहे. त्यामुळे बालबुद्धीच्या काँग्रेसी नेत्यांनी सुनेत्रावहिनींच्या पाया पडून त्यांची माफी मागावी.
>
> **- डॉ. वैशाली घोडेकर, माजी महापौर, नगरसेविका, पिं. चिं. मनपा**

यावेळी पक्षाच्या माजी महापौर डॉ. वैशाली घोडेकर यांनी आक्रमक भूमिका घेत काँग्रेसच्या या वक्तव्याचा तीव्र शब्दांत समाचार घेतला.

यावेळी डॉ. वैशाली घोडेकर म्हणाल्या की, राजकीय मतभेद असणे स्वाभाविक आहे. एखाद्या नेत्याच्या राजकीय भूमिकेवर, निर्णयांवर अथवा कार्यपद्धतीवर टीका करण्याचा अधिकार प्रत्येकाला आहे. मात्र, टीका करताना वैयक्तिक पातळीवर जाऊन एखाद्या महिला राजकीय व्यक्तिमत्त्वाचा अवमान करणे ही महाराष्ट्राच्या राजकीय संस्कृतीला शोभणारी बाब नाही.

पुढे बोलताना त्यांनी सांगितले की, महाराष्ट्राला मोठी राजकीय आणि सामाजिक परंपरा लाभली आहे. या राज्यात महिलांचा सन्मान करण्याची संस्कृती आहे. राजकीय संघर्ष कितीही टोकाचा असला तरी विरोधकांविषयी सभ्यता आणि सन्मान राखला जातो. मात्र, काँग्रेसच्या प्रदेशाध्यक्षांकडूनच महिलांविषयी अशा प्रकारची भाषा वापरली जात असेल, तर हा प्रकार गंभीर व निंदाजनक आहे.

दरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या या निषेध आंदोलनात पक्षाचे नगरसेवक, पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच असंख्य नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. यावेळी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या वक्तव्याचा तीव्र शब्दांत निषेध नोंदविण्यात आला.

सुनेत्राताई पवार यांच्याविषयी करण्यात आलेले वक्तव्य तातडीने मागे घेऊन काँग्रेस प्रदेशाध्यक्षांनी जाहीरपणे माफी मागावी, अशी मागणी यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी केली. तसेच भविष्यात राजकीय टीका करताना महिलांचा अवमान होणार नाही, याची काळजी घ्यावी आणि महाराष्ट्राच्या राजकीय संस्कृतीचा व सभ्यतेचा सन्मान राखावा, असे आवाहनही करण्यात आले. या आंदोलनामुळे उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार यांच्यावरील वक्तव्याचा मुद्दा पिंपरी-चिंचवडच्या राजकीय वर्तुळात चांगलाच तापला असून, राष्ट्रवादी काँग्रेसच्या आक्रमक भूमिकेमुळे आगामी काळात या प्रकरणावरून राजकीय वातावरण आणखी तापण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

# मोशीवरील कचऱ्याचा ताण कमी करा

## ‘क’ प्रभाग सभापती निखिल बोऱ्हाडे यांची आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्याकडे मागणी

**महाईन्यूज** । पिंपरी- चिंचवड

**मोशी येथील कचरा डेपो दुर्घटनेच्या पार्श्वभूमीवर शहराच्या कचरा व्यवस्थापनाचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. मोशी परिसरावर गेल्या अनेक वर्षांपासून पडणारा कचऱ्याचा एकतर्फी ताण कमी करून शहरातील विविध भागांमध्ये विकेंद्रित पद्धतीने कचरा प्रक्रिया केंद्रे उभारावीत, अशी मागणी प्रभाग क्रमांक २ मोशी येथील नगरसेवक तथा ‘क’ प्रभाग सभापती निखिल बोऱ्हाडे यांनी केली आहे.**



याबाबत बोऱ्हाडे यांनी पिंपरी-चिंचवड महानगरपालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांना पत्र देऊन कचरा व्यवस्थापनासाठी दीर्घकालीन आणि शाश्वत नियोजन करण्याची मागणी केली आहे.

मोशी येथे घडलेल्या दुर्घटनेनंतर परिसरातील नागरिकांच्या सुरक्षिततेचा आणि आरोग्याचा प्रश्न पुन्हा एकदा गंभीरपणे समोर आला आहे. शहराच्या विकासासाठी मोशीकरांनी आजवर सातत्याने सहकार्य केले आहे. मात्र, वर्षानुवर्षे शहरातील मोठ्या प्रमाणावरील कचरा मोशी परिसरात आणून टाकला जात असल्याने येथील नागरिकांना त्याचे गंभीर परिणाम भोगावे लागत आहेत, असे बोऱ्हाडे यांनी आयुक्तांना दिलेल्या पत्रात नमूद केले आहे.

मोशी परिसरात मोठ्या प्रमाणावर साचणाऱ्या कचऱ्यामुळे दुर्गंधी, वायू प्रदूषण, भूजल व पाण्याचे प्रदूषण, तसेच कचऱ्यातून निर्माण होणाऱ्या लिचेटमुळे पर्यावरणाची मोठ्या प्रमाणावर हानी होत आहे. या सर्वांचा थेट परिणाम परिसरातील नागरिकांच्या आरोग्यावर होत असून भविष्यात त्याचे अधिक गंभीर परिणाम होण्याची शक्यता आहे, अशी भूमिका निखिल बोऱ्हाडे यांनी मांडली आहे. कचरा व्यवस्थापनाचा प्रश्न केवळ मोशीपुरता मर्यादित न ठेवता संपूर्ण शहरासाठी विकेंद्रित स्वरूपाचे नियोजन करण्यात यावे, अशी ठोस मागणी निखिल बोऱ्हाडे यांनी केली आहे.

शहरातील लोकसंख्या, प्रभागनिहाय कचऱ्याचे प्रमाण आणि भविष्यातील वाढ लक्षात घेऊन किमान १० ठिकाणी पुढील १० वर्षांची गरज लक्षात घेऊन कचरा प्रक्रिया व विल्हेवाटीसाठी जागा निश्चित कराव्यात. या जागा अधिकृतपणे निश्चित करून त्याबाबत स्पष्ट धोरण जाहीर करावे, अशी मागणी त्यांनी आयुक्तांकडे केली आहे.

### ‘मोशीवर अतिरिक्त कचरा टाकू देणार नाही’

दरम्यान, पर्यायी कचरा प्रक्रिया केंद्रांबाबत तातडीने निर्णय घेऊन कार्यवाही न झाल्यास मोशी परिसरात दररोज होणारे ७०० टनांपेक्षा अधिक कचऱ्याचे डम्पिंग तसेच भविष्यात वाढणारा अतिरिक्त कचरा मोशी येथे टाकू देणार नाही, असा स्पष्ट इशारा नगरसेवक निखिल बोऱ्हाडे यांनी दिला आहे. या मागणीबाबत उद्भवणाऱ्या कोणत्याही परिस्थितीस महानगरपालिका प्रशासन जबाबदार राहील, याची नोंद घ्यावी, असेही त्यांनी आयुक्तांना दिलेल्या पत्रात स्पष्ट केले आहे.

### प्रक्रिया क्षमतेपेक्षा ८०० टन अधिक

मोशी येथील वेस्ट-टू-एनर्जी प्रकल्पाची प्रक्रिया क्षमता सुमारे ७०० टन प्रतिदिन आहे. दुसरीकडे शहरातून दररोज सुमारे १,५०० टन कचरा निर्माण होत असल्याने प्रक्रिया क्षमतेपेक्षा सुमारे ८०० टन अतिरिक्त कचऱ्याचे डम्पिंग करण्याची वेळ येत आहे. भविष्यात पिंपरी-चिंचवड शहराची लोकसंख्या वाढत असताना कचऱ्याचे प्रमाणही मोठ्या प्रमाणावर वाढण्याची शक्यता आहे. आगामी काळात दररोज २,००० ते २,५०० टन कचरा निर्माण होण्याची शक्यता लक्षात घेता, आत्तापासूनच दीर्घकालीन नियोजन करणे गरजेचे असल्याचे निखिल बोऱ्हाडे यांनी स्पष्ट केले.

# हिंजवडी आयटी पार्कमध्ये भारत-अमेरिका कमांडोंचा संयुक्त सुरक्षा सराव

**महाईन्यूज** । पिंपरी- चिंचवड

**हिंजवडी आयटी पार्कमध्ये बुधवारी (दि. ५) भारत आणि अमेरिकेच्या विशेष सुरक्षा दलांचा संयुक्त सुरक्षा सराव पार पडला. अमेरिकेच्या १७ विशेष कमांडोंसह भारताच्या नॅशनल सिक्युरिटी गार्डच्या (एनएसजी) १०० हून अधिक 'ब्लॅक कॅट' कमांडोंनी या पाच तासांच्या मॉकड्रिलमध्ये सहभाग घेतला.**





जागतिक स्तरावरील आयटी हब म्हणून ओळखल्या जाणाऱ्या हिंजवडीच्या सुरक्षेचा आढावा घेण्यासाठी आयोजित या सरावात दहशतवादी हल्ला, बंधक सुटका आणि संवेदनशील परिसर सुरक्षित करण्यासारख्या परिस्थितींचे प्रात्यक्षिक सादर करण्यात आले.

सायंकाळी चारच्या सुमारास माण-हिंजवडी परिसरातील एका नामांकित आयटी कंपनीच्या आवारात सायरन वाजवत विशेष सुरक्षा दलाचा ताफा दाखल झाला. अत्याधुनिक शस्त्रांनी सज्ज एनएसजीचे 'ब्लॅक कॅट' कमांडो आणि अमेरिकन विशेष कमांडो वाहनांतून उतरून नियोजित ठिकाणी पोहोचले. सुरुवातीला प्रत्यक्ष कारवाई सुरू झाल्याचा समज झाल्याने परिसरात काही काळ गोंधळाचे वातावरण निर्माण झाले. मात्र, हा पूर्वनियोजित सुरक्षा सराव असल्याचे स्पष्ट झाल्यानंतर कर्मचाऱ्यांनी सुटकेचा निःश्वास सोडला. सायंकाळी ४ ते रात्री ९ या कालावधीत झालेल्या या संयुक्त मॉकड्रिलमध्ये संभाव्य दहशतवादी हल्ला, बंधकांची सुटका, संवेदनशील इमारतीचे संरक्षण, संशयितांचा शोध, परिसर ताब्यात घेणे, आपत्कालीन प्रतिसाद आणि विविध सुरक्षा यंत्रणांमधील समन्वय अशा विविध परिस्थिती निर्माण करण्यात आल्या. त्यानुसार, भारतीय आणि अमेरिकन कमांडोंनी संयुक्तरीत्या कारवाईचे प्रात्यक्षिक सादर केले.

संपूर्ण सरावादरम्यान कंपनी परिसरात कडेकोट सुरक्षा व्यवस्था ठेवण्यात आली होती. मुख्य प्रवेशद्वारांवर अतिरिक्त पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. परिसरातील प्रत्येक हालचालीवर बारकाईने लक्ष ठेवण्यात आले. अत्याधुनिक शस्त्रे, विशेष उपकरणे आणि आधुनिक युद्धतंत्राचा वापर करून कमांडोंनी वेग, अचूकता आणि समन्वयाचे दर्शन घडविले.

### भारतीय-अमेरिकन सुरक्षा समन्वयाची झलक

या मॉकड्रिलमध्ये अमेरिकेच्या १७ विशेष कमांडोंनी एनएसजीच्या १०० हून अधिक 'ब्लॅक कॅट' कमांडोंसोबत संयुक्त सहभाग नोंदविला. विविध काल्पनिक दहशतवादविरोधी परिस्थितींमध्ये दोन्ही देशांच्या विशेष दलांनी समन्वयाने कारवाईचे प्रात्यक्षिक सादर केले. अशा प्रकारच्या संयुक्त सरावातून परस्पर अनुभवांची देवाणघेवाण, प्रतिसाद क्षमता आणि समन्वय अधिक बळकट करण्यावर भर दिला जातो.

**DTE Code 6310**

Approved by AICTE | Accredited by NAAC | Accredited by NBA

PCET- NUTAN

# Nutan Maharashtra Institute of Engineering and Technology

Autonomous Institute | SPPU Affiliated

## Admissions Open for Academic Year 2026—27

| Degree | Programme Name | Choice Code | Intake |
|---|---|---|---|
| B.Tech | Computer Engineering (CE) | 631024510 | 240 |
| B.Tech | Computer Science Engineering (CSE) | 631024210 | 180 |
| B.Tech | Artificial Intelligence & Data Science (AI&DS) | 631099510 | 120 |
| B.Tech | Information Techanology (IT) | 631024610 | 120 |
| B.Tech | CSE Artificial Intelligence (CSE AI) | 631091310 | 60 |
| B.Tech | Electronics and Telecommunication (E&TC) | 631037210 | 120 |
| B.Tech | Mechanical Engineering | 631061210 | 120 |
| B.Tech | Electronics & Computer Engineering | 631084410 | 120 |
| M.Tech | Computer Engineering (CE) | 0631024510 | 12 |
| M.Tech | E&TC (IoT & Sensor System) | 0631095210 | 12 |
| BCA | Bachelor of Computer Applications (BCA) | 0631010110 | 120 |
| MBA | Master of Business Administration (MBA) | 0631010110 | 120 |
| MCA | Master in Computer Application (MCA) | 0631010110 | 120 |
| LL.B. | Bachelor of Laws | 26031 | 60 |
| B.Sc | Cyber and Digital Science (B.Sc) | - | 60 |
| B.Voc. | Bachelor of Vocation (B.Voc.) | - | 180 |

Highest Package for PCET-Nutan
**61 Lakh P.A.**

Average Salary Package
**5.5 Lakh P.A.**

For Admissions Contact:
**8830992988 / 7423080910 / 9028101155**



Scan the QR Code Today to Get More Information

Samarth Vidya Sankul, Vishnupuri, Talegaon Dabhade, Pune – 410507